# www.learningwithsmartness.in

# शिष्यवृत्ती सराव पेपर

## विषय - भाषा गुण 50 गुण

घटक : कविता वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.

## स्कॉलरशिप परीक्षा – इयत्ता चौथी व पाचवी (कविता)

www.learningwithsmartness.in

विद्यार्थ्याचे नाव

---

### कविता १ : लावू रोपटे होईल झाड

लावू रोपटे होईल झाड

पक्षी गातील पानाआड !

येथील फळे बहरतील फुले

झाडाखाली मग खेळतील मुले !

ताजी शुद्ध मिळायला हवा

सुगंध फुलांचा घेऊ नवा !

वाहील वारा असेल आभाळ

झाडाफुलांचा करू सांभाळ !

ढग देतील पाणीच पाणी

पक्षी गातील सुरेल गाणी

प्रश्न १) या कवितेत कोणाचे महत्त्व विशद केले आहे?

(१) पक्ष्यांचे (२) झाडांचे (३) मुलांचे (४) ढगांचे

प्रश्न २) या कवितेत सुवास या शब्दाला कोणता समानार्थी शब्द आला आहे?

(१) सुगंध (२) सांभाळ (३) सुरेल (४) शुद्ध

प्रश्न ३) पानाआड कोण गातात?

(१) मुले (२) पक्षी (३) फुले (४) वारा

प्रश्न ४) मुले कोठे खेळतात?

(१) अंगणात (२) मैदानावर (३) झाडाखाली (४) बागेत

https://learningwithsmartness.in/

प्रश्न ५) या कवितेतून आपल्याला कोणता संदेश मिळतो?

(१) मुलांनी झाडाखाली खेळावे (२) शुद्ध आणि ताजी हवा घ्यावी (३) झाडे लावावी आणि त्यांची निगा राखावी (४) पाणी जपून वापरावे

---

## कविता २ : फुलपाखरू

किती नाजूक हे फुलपाखरू हे
उडतेय कसे ते फुलांफुलांवर
रंग तयाचा सुंदर मनमोहक
पांढरे ठिपके काळ्यावर
शोषून घेई मधुरस फुलांतून
उडते भिरभिर सर्व रानभर
धावती पोरे पकडण्यासाठी
उडते पटकन फुलांपानांवर
हुंदडताना पोरे माळावरती
नाही लागत कुणाच्या हाती
मुलांच्या खेळात असते
मग चिमुकल्यांचे ते खेळसोबती
नानारंगी सुंदर नाजूकसे
पंख देवाने दिले छान
रूप त्याला लांबून पाहू
कोमल जीवाला नका देऊ त्रास त्या मुक्याला
आवडते पहाया फुलपाखरू
फुलांवर मजेत तेच उडताना
फुलांपानांआड लपून बसते
फसगत होतेय ओळखताना

प्रश्न ६) नानारंगी सुंदर ....पंख

(१) कोमल (२) नाजूकसे (३) मनमोहक (४) छान

प्रश्न ७) फुलपाखरू मधुरस कुठून शोषून घेत आहे?

(१) पाने (२) फुले (३) फळे (४) झाडे

https://learningwithsmartness.in/

प्रश्न ८) कवयित्रीला काय आवडते?

(१) फुलपाखरू पकडायला (२) फुलपाखरू उडताना पाहायला (३) फुलपाखरूला त्रास द्यायला (४) फुलपाखरू सोबत खेळायला

प्रश्न ९) कोमल जीव कुणाला म्हटले आहे?

(१) चिमुकले (२) फुलपाखरे (३) पोरे (४) लहान मुले

प्रश्न १०) फुलपाखरांना ओळखताना केव्हा फसगत होते?

(१) फुलांवर मजेत तेच उडताना (२) फुलांपानांआड लपून बसताना (३) धावती पोरे पकडण्यासाठी (४) हुंदडताना पोरे माळावरती

## कविता ३ : ढगांच्या खिडकीतून

ढगांच्या खिडकीतून किरणांच्या झडी

पक्ष्यांच्या पंखावर सोनेरी खडी

पानांच्या चोचीत चंदेरी चारा

फांदयांतून वाहे रूपेरी झरा

धरणीशी जुळल्या प्रकाशाच्या तारा

प्रश्न ११) किरण कोठून येत आहेत

(अ) घराच्या खिडकीतून (ब) ढगांच्या खिडकीतून (क) सोनेरी खिडकीतून (ड) किरणांच्या खिडकीतून

प्रश्न १२) पक्ष्यांच्या पंखावरील खडीचा रंग कसा आहे?

(अ) चंदेरी (ब) पानेरी (क) सोनेरी (ड) रुपेरी

प्रश्न १३) गटात न बसणाऱ्या पर्यायास गोल कर.

(अ) पक्ष्यांचे पंख (ब) पानांच्या चोची (क) प्रकाशाच्या धारा (ड) चंदेरी चारा

प्रश्न १४) झरा या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?

(अ) नदी (ब) पाणी (क) निर्झर (ड) ओढा

प्रश्न १५) कवितेत आलेली नाही अशी यमकाची जोडी कोणती?

(अ) तारा - चारा (ब) खडी - झडी (क) तारा - झरा (ड) वाहे - आहे

## कविता ४ : भिर भिर भिर रे!

भिर भिर भिर रे!

इकडे-तिकडे कोण रे!

उठू चला तर भल्या पहाटे

फुलांत भरले मधाचे साठे

https://learningwithsmartness.in/

इथे उड्डू का तिथे उडू

मौज-मजेचा नाच करू

थकले-भागले फुलपाखरू

अहाहा! पानांचा झोका जरा विसावू!

प्रश्न १६) मध कोणी साठवला आहे?

(अ) फुलांनी (ब) पानांनी (क) झाडाने (ड) फुलपाखराने

प्रश्न १७) थकलेले फुलपाखरू कोठे बसले आहे?

(अ) फुलावर (ब) फांदीवर (क) मधावर (ड) पानावर

प्रश्न १८) फुलपाखराच्या उडण्याला कवितेत काय म्हटले आहे?

(अ) बागडणे (ब) चालणे (क) बसणे (ड) भिरभिरणे

प्रश्न १९) फुलपाखराने केव्हा उठायचे ठरवले आहे?

(अ) सकाळी (ब) पहाटे (क) दिवसा (ड) रात्री

प्रश्न २०) विसावणे या शब्दाचा अर्थ कोणता?

(अ) थांबणे (ब) विश्रांती घेणे (क) विसरणे (ड) विचार

---

## कविता ५ : आज पाहुणे येणार घरा

आज पाहुणे येणार घरा

स्वागताची तयारी करा

चार भिंतीच्या घरकुलात

केवळ दोन पिलांचा किलबिलाट

आजी-आजोबा, काका-काकी

मामा-मामी, आत्या-मावशी

सारे मिळूनी जेव्हा येती

पुरण पोळी, खीर, बासुंदी

गोलाकार पंगत बसती

रंगतात गोड-गोड गप्पा-गोष्टी

आनंदाला मग येते भरती

प्रश्न २१) कवितेत दोन पिले असे कोणास म्हटले असावे असे तुला वाटते?

(अ) आई-बाबांना (ब) घरातील मुलांना (क) आजी-आजोबांना (ड) मामा-मामीला

https://learningwithsmartness.in/

प्रश्न २२) पाहुण्यांसाठी कोणता पदार्थ केलेला नाही?

(अ) पुरण-पोळी (ब) पुरी (क) खीर (ड) बासुंदी

प्रश्न २३) सर्वजण मिळून जेवायला कसे बसतात?

(अ) गोलाकार पंगतीत (ब) स्वयंपाकघरात (क) समोरासमोर (ड) एका रांगेत

प्रश्न २४) त्या दिवशी घरात एकूण किती माणसे असतील असे तुला वाटते?

(अ) १० (ब) ८ (क) ६ (ड) १२

प्रश्न २५) कथा या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?

(अ) गोष्ट (ब) गप्पा (क) गाणी (ड) कविता

शिष्यवृत्ती परीक्षा चौथी सराव पेपर सोडवण्यासाठी खालील वेबसाईटला भेट द्या.

https://learningwithsmartness.in/

NAVNTAH MOHAN LAD

https://learningwithsmartness.in/